N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** श्रीनगर **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0035 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/03/2021 23:09 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भारतीय दंड संहिता १८६० | ४६५ |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | ४६७ |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | ४६८ |
| 4 | भारतीय दंड संहिता १८६० | ४७१ |
| 5 | भारतीय दंड संहिता १८६० | 120-B |
| 6 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(१)(क) |
| 7 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(१)(ड) |
| 8 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(२) |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 26/08/2008

**Date To ( दिनांक पर्यंत):** 16/11/2018

**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 00:00 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/03/2021 **Time (वेळ):** 20:45 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 043 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/03/2021 23:09 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** परिवहन विभाग, कार्यालय,वागळे इस्टेट ठाणे

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक ... पोलीस स्टेशन

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): ज्योती बाळासाहेब देशमुख

(b) **Husband's Name** (पती चे नाव) : बाळासाहेब

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1977 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अँन्टी करप्शन ब्युरो, ,नवी मुबंई,श्रीनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अँन्टी करप्शन ब्युरो, ,नवी मुबंई,श्रीनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अशोक नागुराव करंजकर | | वडील का नाम : नागुराव | 1. 211 ए विंग, गिरीजा निलंकठ हाईट, पोखरण रोड नं 2, ठाणे पश्चिम,श्रीनगर, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री. श्रीकांत सरमोकदम | | | 1. 02, ब्युटी पाम, कोऑसोसायटी,, खोपट, ठाणे पश्चिम,श्रीनगर,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 3 | श्री. कमलाकर वासुदेव दीक्षित | | वडील का नाम : वासुदेव | 1. 401, मैत्री टॉवर,,लुईसवाडी, ठाणे पश्चिम,श्रीनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 4 | श्री.अजित व्दारकानाथ निन्हाळे | | वडील का नाम : व्दारकानाथ | 1. डी/1301, श्री जी व्हिले,,पाचपाखाडी ठाणे,श्रीनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 5 | श्री.गुरूकुमार पांडुरंग पेडणेक | | वडील का नाम : पांडुरंग | 1. ए/1,6/1, योगेश बिल्डींग,श्री गणेश सोसायटी, सेक्टर 28,नेरूळ पश्चिम, नवी मुंबई,श्रीनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र, भारत |
| 6 | श्री.पिटर जॉन पिंटो | | वडील का नाम : जॉन | 1. डी, 190, सेक्टर 3,,ऐरोली, नवी मुंबई ,श्रीनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 7 | श्री.लक्ष्मीकांत धनराज धुमाळ | | वडील का नाम : धनराज | 1. 401, साई मल्हार को ऑ ,हौसींग सोसायटी,गणेश टॉवर जवळ,आग्रा रोड, कल्याण पश्चिम ,श्रीनगर,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | श्री.दिलीप सदाशिव कानडे | | वडील का नाम : सदाशिव | 1. अ/10, गुरुकुल सोसायटी,पाचपाखाडी, ठाणे,श्रीनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 9 | श्री.प्रविण माथुरभाई सोलंकी | | वडील का नाम : माथुरभाई | 1. 101/102,, ए विंग, क्लासिक बिल्डींग,निलंकठ पाम,तुलसीधाम, ठाणे, श्रीनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 10 | श्री.भावेश प्रभुदास भिडे | | वडील का नाम : प्रभुदास | 1. 1401, ए विंग, गोल्डन व्हिलेज,सरदार तारासिंग गार्डन समोर, ,मुंलुड पश्चिम, मुंबई ,श्रीनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे)**:**

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील)**:**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये))**:**

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास))**:**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत )**:**

CR NO I 24/2021 IPC 465,467,468,471,120(ब) व इतर फिर्याद दिनांक:-01 /03/2021

मी ज्योती बाळासाहेब देशमुख, वय 44 वर्ष, पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई सरकातर्फे फिर्याद देते की, मी जुन 2019 रोजी पासुन पोलीस उप अधीक्षक या पदावर अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे कर्तव्यावर हजर झाली असुन, दिनांक 17/11/2020 पासुन पोलीस उप अधीक्षक या पदावर अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई येथे कार्यरत आहे.

अर्जदार प्रविण परशुराम वाटेगावकर, 11-ए, इडनवुडस् लॉरेलहाऊस, बॅरिस्टर नाथ पै रोड, मानपाडा, ठाणे- 4000610 यांनी परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिकेच्या 470 बस प्रवासी निवाऱ्यांच्या मुळ जागी ''बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा'' ( Built Operate & Transfer ) या तत्वावर बस प्रवासी निवारे बांधुन त्यावर जाहिरात प्रदर्शित करण्याचे हक्क देणेबाबतचे निविदेमध्ये व जाहिराती मधुन येणारे उत्पन्ना मध्ये अनियमितता झाले असले बाबतचा अर्ज दिनांक 24/10/2018 रोजी मा.पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात केला. सदर अर्जाच्या अनुशंगाने मा.पोलीस अधीक्षक कार्यालय, अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे यांनी त्यांचेकडील जाक्र/एसपी/डी/661/ ठाणे/2018/4056, दिनांक 16/11/2018 रोजी सदरचे प्रकरण गैरअर्जदार यांचे सक्षम आधिकारी यांचेकडेस पाठविणेबाबत पत्र मा. महासंचालक, अँन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कडेस पाठविले .

सदर बाबत अपर महासंचालक सो., यांनी त्यांचेकडील लजाक्र ACB/Rdr TH/comm/17-APCA/ID/461/2256/19 Date 12/3/19 अन्वये मा.आयुक्त ठाणे महानगरपालिका ठाणे यांना वरील नमुद तक्रारी अर्जातील आरोप व आक्षेप हे आपल्या विभागीशी संबधीत असल्याने सदर प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध आधिनियम 1988 चे कलम 17 (अ) प्रमाणे या कार्यालयास पुढील कार्यवाही साठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागास कलम 17 (अ) नुसार नमुद कालावधीत प्राधिकृत करावेबाबत पत्र दिले आहे.

त्याअनुशंगाने मा.आयुक्त, ठाणे मनपा यांनी त्यांचेकडील जा.क्र.ठामपा/विस/आयु.कार्यालय / 1031(ए),दिनांक 22/11/2019 अन्वये प्रस्तुत प्रकरणी उघड चौकशीची परवानगी दिलेली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये उघड चौकशी करण्याची परवानगी मिळाले नंतर मा.महासंचालक, अँन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई यांनी त्यांचे कडील मुख्यालयकडील जा.क्र.चौ/उघड/266/ठाणे/2019/10668, दिनांक 09/12/2019 व मा.पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांनी त्यांचेकडील मा.पो.अधी.कार्या.जा.क्र.चै/उघड/266/वर्ग-1/ठाणे/2019/5676,दि . 16/ 12 / 2019 अन्वये उघड चैकशीची परवानगी दिले नंतर सदर प्रकरणाची उघड चौकशी करण्यात आली आहे.

ठाणे महानगर पालिका, परिवहन सेवा, ठाणे यांचे 470 प्रवासी निवारा ''बांधा, वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्वावर देण्यात आलेली निविदा व जाहिरात हक्क याबाबत ठाणे महानगरपालिकेचे परिवहन सेवा,ठाणे यांचेकडुन प्राप्त कागदपत्रे, संबंधीत अधिकारी व ठेकेदार यांचेकडे केलेल्या चौकशीवरून खालील बाबी दिसुन आलेल्या आहेत.

(1)परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिकेच्या 470 बस प्रवासी निवाऱ्याच्या मुळ जागी बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा. ( Built, Operate & Transfer ) या तत्वावर बस प्रवासी निवारे बांधुन त्यावर जाहिरात प्रदर्शित करण्याचे हक्क देण्या करीता परिवहन समितीकडील ठराव क्रमाक 66, दिनांक 29/06/2007 अन्वये मंजुरी प्राप्त झाली होती व पुर्वीच्या ठेकेदार यांना 1 वर्षाची मुदतवाढ देण्यात आली होती.

(2)बेस्ट उपक्रमाने मुंबई शहरात उभारलेल्या अदयावत बस प्रवासी निवाऱ्याच्या धर्तीवर बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर ''स्वारस्याची अभिव्यक्ती'' (Expression Of Interest) व्दारे जाहिरात प्रस्ताव मागविण्याचे दिनांक 19/06/2008 रोजी प्रभारी परिवहन व्यवस्थापक यांचे दालनात झालेल्या बैठकीत निश्चित करण्यात आले होते.

(3)दिनांक 20/06/2008 रोजी सदरचा प्रस्ताव दैनिक सकाळ, महाराष्ट्र जनमुद्रा, लोकनायक,फ्री प्रेस जर्नल या वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करून दिनांक 27/06/2008 रोजी पावेतो प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 345 (ड) नुसार मागविण्यात आले होते.

(4)''स्वारस्याची अभिव्यक्ती'' या शिर्षकाखाली जाहिर सुचना क्रंमाक ठामपा/पसे/प्रपव्य/561/08, दिनांक 20/06/2008 अन्वये 1) दैनिक सकाळ, 2) महाराष्ट्र जनमुद्रा, 3)लोकनायक, 4) फ्री प्रेस जर्नल. वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदरचे प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक 27/06/2008 रोजी सायंकाळी 05.00 वा. पावेतो जाहिर करण्यात आलेली होती. त्यानुसार एकुण 15 मोहोरबंद प्रस्ताव प्राप्त झाले होते.

सदर प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करण्याकरीता 1) मा.परिवहन व्यवस्थापक, 2) मा.परिवहन उप व्यवस्थापक, 3) मा.वाहतुक अधिक्षक, 4) मा.मुख्यलेखापाल, 5) मा.उपअभियंता स्थापत्य विभाग, 6) मा.अंतर्गत लेखा परिक्षक, अशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

(5) दिनांक 23/07/2008 रोजी बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर बेस्ट उपक्रमाने मुंबईत बांधलेल्या बस प्रवासी निवाऱ्यांच्या धर्तीवर अदयावत स्वरूपाचे बस प्रवासी निवारे प्रायोजकांकडुन बांधुन घेऊन त्यावर जाहिरात प्रदर्षित करण्याचे हक्क देणे बाबतच्या प्रस्तावावर परिवहन समितीच्या सभेमध्ये चर्चा होऊन परिवहन समितीचे ठरावाव्दारे व त्यानंतर दिनांक 20/08/2008 अन्वये ठाणे महानगरपालिकेचे महासभेचे ठरावानुसार मान्यात देण्यात आली.

(6)दिनांक 19/03/2008 रोजी परिवहन समितीने प्रायोजकांकडील प्रस्ताव छाननी/पडताळणी करीता मे.टंडन असोसिएटस्, सांताक्रुझ,मुंबई यांची नेमणुक करण्यास ठरावाव्दारे मान्यता दिली त्यानुसार दिनांक 22/08/2008 रोजी मे.टंडन असोसिएटस् यांनी 15 प्रायोजकापैकी 1) मे. प्रचार कम्युनिकेशन लि., 2) मे.प्रोॲक्टीव्ह इन अँण्ड आऊट पब्लिसिटी, 3) मे.मेट्रो सिटी पब्लिसिटी, 4) मे. एस एस एजन्सीज यांचे प्रस्ताव विचार करण्याजोगे व उत्तम असल्याचे लेखी अहवालाद्वारे कळविले होते.

(7)मे.टंडन असोसिएटस्, सांताक्रुझ, मुंबई यांनी दिनांक 25/08/2008 रोजी दिलेला अहवाल सविस्तर नसल्याने व दिनांक 26/08/2008 रोजी दिलेल्या अहवालामध्ये विसंगती असल्याने तो नाकारण्यात आला व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 5(2) (1) मधील तरतुदीनुसार व मा.मुख्यलेखा व वित्त अधिकारी, ठाणे महानगरपालिका यांनी त्यांचे दिनांक 26/08/2008 रोजीच्या अहवालात प्रस्तावित केल्यावरून केवळ वाटाघाटी व्दारे निर्णय घेणे योग्य नसल्याने. सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या 15 प्रायोजकांपैकी 3 प्रायोजकांनी स्पष्ट प्रस्ताव दिलेला नसल्याने, उर्वरीत 12 प्रायोजक 1) मे.सोल्युशन अँडव्र्हटायझिंग, ठाणे, 2) मे.पुर्णिमा अँण्ड एंजन्सी प्रा.लि. अहमदाबाद, 3) मे.पृथ्वी असोसिएट,मुंबई, 4) मे.पिर्नेकल पॉलिट्रेड प्रा.लि.,मुंबई, 5) मे.प्रचार कम्युनिकेशन लि.मुंबई, 6) मे.प्रोॲक्टीव्ह इन अँण्ड आऊट अँडव्र्हटायझिंग,मुंबई, 7)मे.राजदिप पब्लिसिटी प्रा.लि.अहमदनगर, 8) मे.एस.एस.एजन्सीज,नवी मुंबई, 9) मे.मेट्रोसिटी पब्लिसिटी, नवी मुंबई, 10) मे.श्री स्टार आऊट डोअर्स कम्यनिकेशन,ठाणे, 11) मे.एक्सल अँडव्र्हटायझिंग अँण्ड मार्केटिंग, ठाणे, 12) मे.वन अप मेडिया नेटवर्क, मुंबई यांचेकडुन बस निवारे बांधुन त्यावर जाहिरात प्रसिध्दीचे हक्क देण्याकरीता जाहिर निविदा दिनांक 01/09/2008 रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आल्या होत्या. निविदा प्रपत्र खरेदी करून प्रथम दिनांक 08/09/2008 रोजी व त्यानंतर दिनांक 09/09/2008 रोजी सकाळी 11.00 वाजेपर्यत मोहरबंद निविदा परिवहन सेवा,ठाणे येथे सादर करणे बाबत लेखी पत्राव्दारे कळविण्यात आले होते. त्यानुसार अनुक्रमांक 1,3,5,6,7,8,11 यांनी निविदा फॉर्म खरेदी केले व त्यापैकी अनुक्रमांक 1, 5, 6 व 11 यांनी निविदेची इसारा रक्कम प्रत्येकी 10 लाख प्रमाणे भरणा केली. दिनांक 10/09/2008 रोजी सदर निविदा या नियोजीत निर्मलादेवी चितांमणी दिघे सभागृह येथे न उघडता परिवहन उप व्यवस्थापक श्री.कमलाकर दीक्षित यांचे दालनात उघडण्यात आल्या. त्यावेळी सदर निविदा प्रक्रियेच्या छाननी समितीचे सदस्य म्हणुन 1) श्री. कमलाकर वासुदेव दीक्षित,तत्कालीन परिवहन उप व्यवस्थापक 2) श्री.अजित निऱ्हाळे, तत्कालीन मुख्यलेखापाल 3) श्री.गुरुकुमार पेडणेकर, तत्कालीन वाहतुक अधिक्षक 4) श्री.लक्ष्मीकांत धनराज धुमाळ, सुरक्षा अधिकारी 5) श्री.पिटर जॉन पिंटो, तत्कालीन अंतर्गत लेखा परिक्षक, 6) श्री दिलीप कानडे, तत्कालीन वाहतुक निरीक्षक असे हजर होते.

तसेच यातील इसारा भरणा केलेले निविदाकार/निविदा प्रतिनिधी म्हणुन अनुक्रमांक 1, 5 व 11 या कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

दिनांक 10/09/2008 रोजी सदर निविदा प्रक्रियेतील लखोटा क्रंमाक 1 उघडण्यात आला. त्यावेळी एकुण 4 निविदाकाराचा लखोटा क्रंमाक 1 मध्ये दयावयाचा कागदपत्राचा तपशिल दर्शविणारा तक्ता वाहतुक निरीक्षक श्री. कानडे यांनी तयार केला असुन त्या तक्त्यावर व उपस्थितीबाबत सर्व हजर आधिकाऱ्यांनी सहया केल्या आहेत.

सदर तक्त्यामध्ये श्री.कानडे यांनी चार ही कंपन्यांचे आर्थिक निकष, अनुभवाचा दाखला बॅक तपशिल बाबतचे विवेचन केले असुन मे. सोल्युशन अँडव्हर्टायझिंग जाईन्ट व्हेंचर असल्याचे नमुद केले आहे. सदर बाबतचे निरीक्षक टिपणी मध्ये श्री.कानडे यांनी मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग यांचे दिनांक 09/09/2008 रोजी केलेले तीन संस्थाच्या समवेतचे कन्सोर्टियम डिड असल्याचे नमुद केले आहे.

सदर टिपणीवर तत्कालीन वाहतुक निरीक्षक श्री. कानडे यांनी प्रस्तावित करून त्यावर परिवहन अधीक्षक म्हणुन श्री.गुरुकुमार पेडणेकर, परिवहन उप व्यवस्थांपक म्हणुन श्री. दीक्षित यांची व परिवहन व्यवस्थापक म्हणुन श्री.अशोक कंरजकर यांची सही आहे.

(8)दिनांक 11/09/2008 रोजी निविदेचा लिफाफा क्रं.2 हा नियोजीत निर्मलादेवी चितांमणी दिघे सभागृह येथे न उघडता श्री.कमलाकर दीक्षित यांचे कार्यालयात उघडण्यात आला वरील चार प्रायोजका पैकी मे.प्रचार कम्युनिकेशन प्रा.लि. व मे.सोल्युशन्स अँडव्हर्टायझिंग, ठाणे या दोन निविदाकारांनी लखोटा क्रंमाक 1 मध्ये दिलेली कागदपत्रे निविदेच्या निकषानुसार योग्य असल्याने त्यांचे लखोटा क्रंमाक 2 मधील देकार छाननि समिती सदस्य व निविदाकार कंपन्याचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात आले त्यावेळी त्यांनी हजर असल्याबाबत स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

निविदा प्रक्रियेतील लखोटा क्रंमाक 2 उघडले नंतर निविदे मधील पात्र दोन्ही निविदाकारांनी दिलेले देकार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. तपशिल | मे.सोल्युशन अँडव्र्हटायझिंग | मे.प्रचार कम्युनिकेशन लि. |
|---|---|---|
| १470 बस प्रवासी निवाऱ्याची उभारणी करून देवुन जाहिरात प्रदर्शित करण्याच्या हक्काच्या मोबदल्यात परिवहन सेवेस देवु केलेल्या नविन सेमीलो फ्लोअर युरो III बसेसची संख्या | 9 बसेस | 7 बसेस |
| २ परिवहन सेवेस देवु केलेल्या नविन बसेसचा ( फुल्ली बॉडी, बिल्ड पॅसेंजर बस) मेक मॉडेल, मॅन्युफॅक्चरींग कंपनी | टाटा सेमीलो फ्लोअर युरो - III | टाटा एल पी ओ 1612/59 डब्लु |
| ३ देवु केलेल्या बसेस परिवहन सेवेत | 180 दिवस किंवा कंपनीच्या | |

| | | | |
|---|---|---|---|
| पुरविणेसाठी लागणारा दिवस,मुदत,कालावधी | डिलीव्हरी शेडयुल प्रमाणे | | 6 महिने |
| ४ बांधावयाच्या 470 बस प्रवासी निवाऱ्या पैकी स्टेनलेस स्टील मटेरियलच्या बस प्रवासी निवाऱ्यांची संख्या | 117 | 175 | |
| ५ बांधावयाच्या 470 बस प्रवासी निवाऱ्या पैकी माईल्ड स्टील मटेरियलच्या बस प्रवासी निवाऱ्यांची संख्या | 181 | --- | |
| ६ 470 बस प्रवासी निवारे बांधकामाच्या कालावधीत सध्याच्या बस प्रवासी निवाऱ्या वरील जाहिरातीचे हक्का पोटी देवु केलेल्या देकाराची रक्कम | रु 5 लाख | | --- |
| ७ सध्यस्थितीतील 470 बस प्रवासी निवाऱ्याची भंगार सामानाची देवु केलेली एकत्रीत रक्कम | रु 1 लाख | रु 50 हजार | |
| ८ बस प्रवासी निवारे बांधण्याकरीता लागणारा कालावधी | ---- | 1 वर्ष 6 महिने | |

वरील तक्त्यानुसार मे.सोल्युशन अँडव्हरटायझिंग यांचा देकार योग्य असल्याबाबतचे टिपणीवर सदर टिपणीवर परिवहन सेवेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वाक्षऱ्या करुन मान्यता दिली आहे.

दिनांक 11/09/2008 रोजी श्री.कानडे यांनी मे.सोल्युशन अँडव्हरटायझिंग यांचे देकारातुन आर्थिक विश्लेषण करता 8,62,63,450/-रू एवढ्या किंमतीच्या पायाभुत सुविधा परिवहन सेवेस मिळणार असल्याचे नमुद करुन देकारामधील 9 बसेस मधुन भविष्यात मिळणारे प्रवासी वाहतुकीचे जास्तीस जास्त उत्पन्नाचा उहापोह करुन सदर कंपनीचा देकार सर्वथा योग्य असल्याची शिफारस केली. सदर टिपणीवर परिवहन सेवेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वाक्षऱ्या करुन मान्यता दिली आहे.

(9) दिनांक 12/09/2008 रोजी मुख्य लेखा परिक्षक यांनी सदर नस्तीचे अवलोकन करुन त्यानुसार निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे सुरक्षा अनामत रकमेपोटी एकुण देकारावर 25 टक्के सुरक्षा रक्कम घेण्यात यावी हे महत्त्वाचे निरीक्षण मांडले आहे.

(10)दिनांक 12/09/2008 रोजी छाननि समितीतील श्री.पेंडणेकर यांनी परिवहन व्यवस्थापक यांचे मान्यतेने परिवहन समितीकडे सादर केलेले वरील देकाराचे प्रस्तावावर समितीच्या काही सदस्यांनी आक्षेप नोदंविल्यानंतरही त्याबाबत दिनांक 16/09/2008 रोजी परिवहन समितीचे बैठकीमध्ये व्यवस्थापक श्री.करंजकर यांनी मे.सोल्युशन अँडव्हरटायझिंग यांचा एकुण देकार रुपये 8,62,63,459/- हा योग्य असल्याचे व निविदा प्रपत्रातील अटी व शर्ती नुसार त्यांची निविदा उच्चतम दराची व योग्य असल्याचे समिती पुढे विवेचन करुन सदर प्रस्ताव मंजुर करुन घेतला.

(11) दिनांक 20/09/2008 रोजी परिवहन व्यवस्थापक यांनी मे.सोल्युशन अँडव्हरटायझिंग ठाणे यांना कार्यादेश दिला. परंतु, त्यामध्ये निविदेतील अटी शर्ती प्रमाणे त्यांचा एकुण देकार जो की, 8,62,63,450/-रु एवढा असल्याचे मान्य केले होते. त्याऐवजी देकाराच्या 9 बसेस व त्याच्या किंमतीवर अधारीत असलेली 25 टक्के अनामत रक्कम बँक गॅरटी देण्याबाबत कळविले.

तसेच दिनांक 30/09/2008 रोजी तत्कालीन परिवहन व्यवस्थापक, परिवहन सेवा, यांनी मे.सोल्युशन्स अँडव्हर्टायझिंग, ठाणे यांना अंतरीम कार्यादेश दिला. प्रस्तुत कार्यादेशामध्ये टाटा मोटर्सच्या 9 बसेसची किंमत रु 2,07,63,450/- कळविली होती. त्यानुसार त्यांची 25 टक्के अनामत रक्कम 51,90,862.50/-रू भरणा करावी असे नमुद करण्यात आले आहे.

(12)दिनांक 09/06/2009 रोजी मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग, ठाणे यांनी स्वतःसाठी युनियन बँक ऑफ इंडिया, अंधेरीशाखा, मुंबई येथुन बस खरेदी करण्यासाठी कर्ज काढले असुन त्यासाठी लागणारे हायफोथिकेशन बँकेच्या नावे सदरच्या देकारातील 9 बसेसवर करण्यात यावेत. म्हणुन पत्र दिले होते. वास्तविक देकारातील सदर 9 बसची मालकी ही परिवहन विभागाची असुन त्यावर अशाप्रकारे खाजगी व्यक्तीचे बँक कर्जाचे हायफोथिकेशन साठी तत्कालिन उप व्यवस्थापक श्री.दिक्षीत व परिवहन व्यवस्थापक श्री.सरमोकदम यांनी प्रस्तावाव्दारे बेकायदेशीररित्या मान्यता दिली.

(13)दिनांक 20/06/2009 रोजी मे.सोल्युशन्स अँडव्हर्टायझिंग, ठाणे यांनी निविदेचे भरणा केलेले इसारा रक्कम रूपये 10,00,000/-रुपये परत मिळण्याकरिता परिवहन व्यवस्थापक यांना विंनती केली असता परिवहन व्यवस्थापक यांनी निविदेतील अटी शर्तीचा भंग करुन दिनांक 22/06/2009 च्या टिपणीव्दारे ठेकेदार यांना 10,00,000/- रुपये इसारा रक्कम परत देण्यास बेकायदेशीर मान्यता दिली आहे.

(14)निविदेतील अटी शर्तीनुसार बस निवाऱ्यांच्या बाधंकामासंबधी स्थापत्य विभागाचे प्रमाणपत्राची आवश्यकता असताना मे.सोल्युशन अँडव्हरटायझिंग यांनी बस निवारे बांधकामाबाबत खाजगी वास्तुविशारद मे.प्रदिप देशमुख अँन्ड असोशिएट कन्स्लटींग इंजिनियर्स यांचे दिलेले प्रमाणपत्र परिवहन सेवेच्या आधिकाऱ्यांनी गैरकायेदशीर पणे मान्य करुन ठेका चालु ठेवला.

(15) मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग यांनी करारनाम्याच्या शर्तीनुसार पुर्तता केली नसल्यामुळे या प्रकरणी विधानसभा महाराष्ट्र राज्य येथे प्रश्न उपस्थित झाल्यांनंतर त्यावरुन दिनांक 22/02/2010 रोजी महाराष्ट्र शासन व दिनांक 20/04/2010 रोजीच्या महासभेच्या आदेशानुसार सदर प्रकरणाची चौकशी ठाणे महानगरपालिकेकडील मा.अतिरीक्त आयुक्त यांचे मार्फत करण्यात आली.

सदर चौकशीमध्ये (1) निवीदा प्रक्रियेतील अनियमितता (2)स्थळ भेटी अंती दिसुन आलेल्या अनियमितता (3) बस पुरवठयातील आलेल्या अनियमितता (4)निवारे उभारण्यातील अनियमितता (5) प्रशासकीय अनियमितता यामधील निष्पन्न झालेल्या गंभीर बाबी, निविदा प्रक्रियेतील अटी शर्तींचे भंग झाल्याचे दिसुन आल्याने दिनांक 27/08/2010 रोजी महापालिकेचे महासभेने ठरावाव्दारे सदरचा ठेकेदाराचा ठेका रदद् करण्याचा ठराव पारीत केला.

दिनांक 17/04/2013 रोजी मा.महासभेने ठराव क्रमांक 17 अन्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील दाखल याचिका क्रमांक 12047/2012 मध्ये दिनांक 01/02/2013 रोजी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्याबाबत व मा.परिवहन समितीने ठराव क्रमांक 237, दिनांक 25/03/2013 अन्वये दिलेल्या शिफारसबाबत सर्वानुमते मंजुरी दिली .

त्याप्रमाणे दिनांक 10/06/2013 रोजी परिवहन सेवा व मे.सोल्युशन्स अँडव्हर्टायझिंग, ठाणे यांचेमध्ये नव्याने करारनामा करण्यात आला . त्याप्रमाणे मे.सोल्युशन्स अँडव्हर्टायझिंग, ठाणे यांना दिनांक 09/08/2024 पावेतो कामाची मुदतवाढ देण्यात आली.दिनांक 05/07/2013 रोजी मे. सोल्युशन अँडव्हटायझिंग यांना नव्याने कार्यादेश देण्यात आला आहे.

(16) मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग यांनी किती बस थांब्यावर जाहिराती प्रर्दशित केल्या यासंबधाने परिवहन विभागास तक्रार प्राप्त झाल्याने

त्याबाबत परिवहन विभागाकडुन सर्वेक्षण केले असता दिनांक 10/06/2013 ते दिनांक 31/12/2017 पावेतो एकुण 55 टक्के बस थांब्यावर जाहिरात प्रर्दशित करण्यात आल्याचे गृहित धरुन व मे.सोल्युशन अँडव्हटायझिंग यांचे कडुन दि.20/7/2018 सादर केलल्या बिलांची तपासणी केली असता दि.10/07/2013 ते 31/12/2017 या कालावधीत प्रदर्शित केलेल्या जाहिरातींसाठी एकुण रक्कम रुपये 5,21,52,976/- एवढी भरणे आवश्यक असताना त्यांनी 21,72,030/- रुपये एवढीच रक्कम भरल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे जाहिरात फी जाहिरात विभागास ठेकेदाराने 4,99,80,946/-रुपये एवढा रकमेची करचुकवेगिरी करुन महापालिकेचे आर्थिक नुकसान केले आहे. परंतु यासंबधाने महापालिकेने ठेकेदारास दिलेले दंडाचे नोटीसी विरुध्द ठेकेदाराने दिवाणी न्यायालय, ठाणे येथे दावा दाखल केला असुन तो न्यायप्रविष्ठ आहे.

एकदरीत उघडचौकशीचे चौकशीमध्ये निदर्शनास आलेल्या बेकायदेशीर बाबीत खालीलप्रमाणेः-

1)निविदा दस्ताऐवज मधील लखोटा क्रमांक 1 मधील तांत्रीक बाबीचा लखोटा सोबत जोडावयाच्या कागदपत्रातील मुद्दा क्रमांक 5 मध्ये "निविदाकाराच्या लगतच्या मागील 3 (तीन) वर्षाची वार्षिक उलाढाल रुपये 10 कोटी (दहा कोटी) असल्याबाबत लगतच्या मागील 3 (तीन) वर्षाचा सनदी लेखाकाराने प्रमाणीत केलेला वार्षिक ताळेबंद व नफा तोटा पत्र '' असे नमुद केले होते. प्रस्तुत अटीच्या अनुशंगाने निविदाकाराचे मागील तीन वर्षाची उलाढाल 10 कोटी असणे आवश्यक होते. परंतु मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग यांनी निविदासोबत मे.झेनिथ अँडव्हर्टायझिंग, मे.गुज्जु अँडव्हर्टायझिंग, मे.विश्वार पब्लिसीटी व त्यांचे स्वतःचे जॉइन्ट व्हेंचर दर्शवुन कागदपत्रे सादर केले होते. त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये मे.झेनिथ अँडव्हर्टायिझंग यांचे सन 2005- 06, 2006-07 आर्थिक वर्षाचे ताळेबंद होते.परंतु सन 2007-08 चे वार्षिक ताळेबंद कागदपत्रांसमवेत जोडलेले नव्हते. तसेच ते सनदी लेखाकाराने प्रमाणीत देखील केलेले नव्हते. तसेच मे.गुज्जु अँडव्हर्टायझिंग, मे.विश्वार पब्लिसीटी व मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग यांचे सन 2005-06, 2006-07 व 2007-08 या आर्थीक वर्षाचे ताळेबंद पत्रिका असुन त्यांची वार्षीक उलाढाल 10 कोटी रुपयांपेक्षा कमी होती.

चौकशी दरम्यान श्री.यशराज महेंद्र गाला, संचालक, मेसर्स झेनिथ आउटडोअर प्रायव्हेट लिमीटेड यांचे जबाबावरुन त्यांनी सन 2008 मध्ये ठाणे परिवहन सेवा, ठाणे विभागाचे कोणत्याही प्रकारचे निविदा भरण्यासाठी त्याचे कंपनीचे कोणतेही कागदपत्रे मे.सोल्युशन अँडव्रहटायझिंग यांना दिलेले नव्हते. त्यांचे परवानगी शिवाय मे.सोल्युशन अँडव्रहटायझिंग यांनी त्यांचे कंपनीचे कागदपत्राचा व नावाचा गैरवापर केल्याचे निष्पन्न झाले

तसेच परिवहन सेवेच्या छाननी समितीच्या सदस्यांनी निविदेच्या अटी व शर्तीमध्ये जाईन्ट व्हेंचरची तरतुद नमुद नसताना सदरची डीड व त्यासोबतची कागदपत्रे मान्य करुन सदर कन्सोर्टीयम डीडच्या आधारे मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग यांना ठेका मिळवुन देण्यासाठी बेकायदेशीर रित्या मदत केली आहे.

2)प्रस्तुत निविदा प्रक्रियेमध्ये निविदा व त्यासोबतची कागदपत्रे परिवहन सेवेस सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक 09/09/2008 रोजी सकाळी 11.00 वा पावेतो होती. मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग, ठाणे यांनी निविदा लिफाफा क्रं. 1 मध्ये (तांत्रिक बाबीमध्ये) कन्सोर्टियम डिड करारनामा सादर केला आहे.

सदर करारानामाचा मुंद्राक (स्टॅम्प पेपर) बी.आय.ओ शेअर होल्डींग लिमीटेड कंपनीतुन दिनांक 09/09/2008 रोजी साधारण दुपारी 02.00 नंतर विकला गेला असुन सदर करारनामा हा दिनांक 08/09/2008 रोजी केला असल्याचे दर्शविले आहे. तसेच सदर कन्सोर्टियम डिड वर असलेले सही संबधाने झेनीथ आऊट डोअर्स प्रा.लि चे अग्रेलो परेरा याचे कडेस चौकशी केली असता, सदरची सही त्यांनी केली नसुन इतर कोणीतरी सही केली असल्याचे त्यांनी त्यांचे जबाबामध्ये सांगितले आहे

यावरून मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग, ठाणे यांचे प्रोप्रायटर श्री.प्रविण सोंलकी यांनी बनावट कन्सोर्टीयम डीड तयार केली असल्याचे निष्पन्न होत आहे. त्यानंतर श्री.कानडे, तत्कालीन वाहतुक निरीक्षक यांनी सदरची डिड ही निविदा कागदपत्रे सादर करण्याची तारीख निघून गेल्यानंतर श्री.सोलंकी यांचेकडून सदर डिड घेवून, ती निविदाच्या कागदपत्रांमध्ये समाविष्ट केली आहे. तसेच छाननी समितीने सदरचे बनावट कन्सोर्टियम डिड मान्य करून मे.सोल्युशन अँडव्रहटायझिंग,ठाणे यांना ठेका मिळवुन देण्यासाठी मदत केलेली आहे.

3)अ) निविदा प्रक्रियेमध्ये 3 निविदाकार पात्र असणे आवश्यक आहे. परंतु सदर निविदेचे प्रक्रियेमध्ये निविदाकार 1) मे.एक्सल अँडव्हर्टायझिंग यांची मागील तीन वर्षाच्या प्रत्येक वर्षाची त्यांची वार्षीक उलाढाल रुपये 10 कोटी पर्यत नसल्याने त्यांनी जॉईन्ट व्हेंचर करण्याची परवानगी मागितली होती. 2) मे.प्रोअॅक्टीव्ह इन अँण्ड आऊट अँडव्हर्टायझिंग यांची वार्षीक उलाढाल 8.62 कोटी रुपये इतकी होती. 3) मे.प्रचार कॅम्युनिकेशन यांची वार्षीक उलाढाल 10 कोटी रुपये तसेच जाहिरात प्रसिध्दीचा तीन वर्षाचा अनुभव होता. 4) मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग यांनी मे.विश्वार पब्लिसिटी, मे.झेनिथ आउटडोअर व मे.गुज्जु अँड प्रायव्हेट लिमीटेड यांनी जॉईन्ट व्हेंचर करुन सर्व संस्थाची एकत्रित उलाढाल दहा कोटी रुपये असल्याचे दर्शविले होते. वर नमुद चार ही निविदाकारांपैकी अटी व शर्ती नुसार मे.प्रचार कम्युनिकेशन हेच पात्र ठरत होते. अशा परिस्थितीत सदर निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने निविदा प्रक्रिया राबविणे उचित ठरले असते. परंतु छाननी समितीतील अधिकारी यांनी बेकायदेशिर रित्या मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग,ठाणे यांना पात्र ठरवुन त्यांना ठेका मिळवुन देण्यास मदत केलेली आहे.

ब) परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिकेच्या सदर निविदा प्रक्रीये मधील लखोटा क्रंमाक 2 उघडते वेळी मे.एक्सल अँडव्हर्टायझिंग अँण्ड मार्केटिंग,ठाणे यांचे प्रतिनिधी श्री.कृष्णा कोबनाक हजर असल्याचे उपस्थिती पत्रावर दर्शविण्यात आलेले आहे. परंतु श्री कृष्णा कोबनाक यांचेकडे केलेल्या चौकशी दरम्यान त्यांनी लखोटा क्रंमाक 2 उघडते वेळी ते हजर नसल्याचे सांगुन उपस्थिती पत्रावर असलेली स्वाक्षरी त्याची नसल्याचे सांगितलेले आहे. यावरुन छाननी समितीने श्री.कृष्णा कोबनाक हे हजर नसताना त्यांची बनावट सही खरी असल्याचे भासवुन मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग, ठाणे यांना बेकायदेशीर रित्या ठेका मिळवुन देण्यास मदत केलेली आहे.

4) टाटा मोटर्स यांचेकडील पत्रानुसार मे. सोल्युशन अँडव्हार्टायझिंग हे परिवहन विभागास देकाराव्दारे देणार असलेल्या 9 बसेसची आसन क्षमता प्रत्येकी 44 व गर्दीचे वेळेस 94 प्रवासी वाहून नेण्याची क्षमता असल्याचे दिसुन येते. परंतु परिवहन विभागचे संबधित आधिकाऱ्यांनी टिपणीमध्ये जाणीवपुर्वक बसेसची आसनक्षमता 94 व गर्दीचे वेळेस 110 ते 130 प्रवासी वाहून नेण्याची दर्शविली. त्यामुळे परिवहन सेवेस प्रतिदिन प्रतिबस 6300/- रुपये इतके उत्पन्न तिकीटविक्री व्दारे प्राप्त होईल त्याचाच अर्थ एकुण 9 बसेसपोटी परिवहन सेवेस 12 व्या वर्षी 28.77 कोटी, 13 व्या वर्षी रक्कम रुपये 31.17 कोटी, 14 व्या वर्षी रक्कम रुपये 33.57 कोटी व 15 व्या वर्षी 35.97 कोटी असे निविदाकार मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग यांनी दिलेल्या देकाराचे आर्थिक विश्लेषण जाणीवपुर्वक वाढीव दराचे करण्यात आले आहे. जेणेकरून मे. सोल्युशन अँडव्हर्टायझिंग यांनी दिलेला देकार सर्वश्रेष्ठ असल्याचे भासवून, परिवहन समितीची दिशाभुल करून, त्यांना ठेका देण्यासाठी अवैधरीत्या मदत केली आहे.

5)निविदा करारनाम्याचे अट क्र 8 मध्ये '' द्वितीय पक्षाने प्रथम पक्षास एकुण देऊ केलेल्या देकाराच्या 25 टक्के रक्कम रोखीने अथवा सार्वजनिक क्षेत्रातील बँकेच्या स्थानिक शाखेच्या धनाकर्षाद्वारे किंवा बँक गॅरेन्टी स्वरुपात दयावयाची आहे हे द्वितीय पक्षाने मान्य केले आहे.'' असे नमुद आहे. सदर करारनामामध्ये नमुद व्दितीय पक्ष हे मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग,ठाणे हे आहेत.

लेखापरिक्षा विभाग, ठामपा यांची दिनांक 12/09/2008 रोजीचे टिपण्णी मध्ये ''निविदा अटी व शर्तीप्रमाणे सुरक्षा अनामतीपोटी

देकाराच्या 25 टक्के रक्कम घ्यावयाची आहे. तथापि, देकाराप्रमाणे परिवहन सेवेस काही बसेस मिळणार असुन जाहिरातीच्या हक्कापोटी रक्कम मिळणार आहे. तरी सदर एकुण देकारावर सुरक्षा अनामत घेण्यात यावी'' असे नमुद केलेले आहे.

मे.सोल्युशन्स अँडव्हर्टायझिंग,ठाणे यांचे देकारात बांधुन मिळणाऱ्या बस प्रवासी निवाऱ्यांची संख्या 298 व उर्वरीत बस निवाऱ्यांची रंगरंगोटी व 9 टाटा सेमी लो फ्लोअर बसेस असे असून, त्यांचा एकुण देकार रू. 8,62,63,450/- होता व त्यावरील 25 टक्के रक्कम म्हणजे रू. 2,15,65,863/- एवढी होत असताना देखील मे. सोल्युशन अँडव्हर्टायझिंग हे देणार असलेल्या 9 बसेसच्या एकत्रीत किंमत रक्कम रू 2,07,63,450/- यावरील 25 टक्के इतकी रक्कम रू. 51,90,862.50/- ची बँक गॅरंटी घेण्यात आली आहे. अशाप्रकारे मे. सोल्युशन अँडव्हर्टायझिंग यांना कमी रक्कमेची बँक गॅरंटी आकारून, रू. 1,63,75,000/- चा ठेकेदाराचा आर्थिक फायदा करून, महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान केले आहे.

6)निविदाचे अट क्रंमाक 6.6 नुसार यशस्वी निविदाकाराकडुन वेळेत काम न झाल्यास इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल असे नमुद होते. तसेच मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग, ठाणे व ठाणे परिवहन सेवा यांचेमध्ये झालेल्या करारनाम्यामध्ये ठेकदार यांनी निविदेसोबत सादर केलेली इसारा रक्कम ही ठेकेदार यांना परत करण्याची करारनाम्यामध्ये कोणतीही तरतूद नव्हती

तरी सुध्दा मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग,ठाणे यांनी इसारा रक्कमची बेकायदेशीररित्या मागणी केले नंतर परिवहन सेवेचे संबंधीत अधिकाऱ्यांनी त्याचा पदाचा दुरुपयोग करून सक्षम प्राधिकरणाची मान्यता न घेता ठेकेदार यांना इसारा रक्कम रु 10 लाख हि बेकायदशीररित्या परत करून सदर ठेकेदाराचा आर्थिक फायदा करून मनपाचे आर्थिक नुकसान केले आहे.

7)निविदाचे अट क्रंमाक 20 नुसार बस प्रवासी निवाऱ्याचे बांधकाम पुर्ण झाले नंतर ते योग्य प्रकारे झाले असल्या बाबतचा स्थापत्य विभागाचा दाखला निविदाकारने देणे बंधनकार राहिल असे नमुद असतानाही मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग,ठाणे यांनी खाजगी वास्तुविशारद मे.प्रदिप देशमुख अँन्ड असोसिएट यांचे बस निवाऱ्या संदर्भातील दिलेले प्रमाणपत्र परिवहन सेवेच्या अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे. सदरची बाब ही निविदा अटी व शर्तीचा भंग करून ठेकेदारास बेकायदेशिर रित्या फायदा पोचवण्याच्या उद्देशाने केलेले आहे.

8)मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग, ठाणे हे पुरविणाऱ्या बसेसच्या हायपोथिकेशनची करारनाम्यामध्ये कोणतीही तरतुद नसताना ठामपा परिवहन सेवा चे अधिकाऱ्यांनी टिपणी प्रस्तावित करून दिनांक 17/06/2009 रोजी जा.क्र.ठामपा/पसे/पव्य/वाह./135/2009 अन्वये युनियन बँक ऑफ इंडिया, अंधेरी शाखेस हायफोथिकेशन मान्य असल्याचे पत्र गैरकायेदशीर पणे दिले आहे.

अशाप्रकारे सन 2008 ते 2018 या कालावधीत परिवहन विभाग, ठाणे महानगरपालिकेचे लोकसेवक (1) श्री. अशोक नागुराव करंजकर, वयः- 52 वर्ष, तत्कालीन परिवहन व्यवस्थापक, परिवहन सेवा, ठाणे ( तत्कालीन प्रतिनियुक्तीवर असलेले उप जिल्हाधिकारी दर्जाचे) रा. 211 ए विंग, गिरीजा निलंकठ हाईट्स, पोखरण रोड नं. 2, ठाणे पश्चिम (2) श्री. श्रीकांत सरमोकदम, तत्कालीन परिवहन व्यवस्थापक, परिवहन सेवा, (सेवानिवृत्त) रा.102, ब्युटी पाम, को.ऑ.सोसायटी, खोपट, ठाणे पश्चिम (3) श्री. कमलाकर वासुदेव दीक्षित, वयः- 67 वर्ष, तत्कालीन परिवहन उप व्यवस्थापक, ठाणे (सेवानिवृत्त) रा. 401, मैत्री टॉवर, लुईसवाडी, ठाणे पश्चिम (4) श्री.अजित व्दारकानाथ निऱ्हाळे, वयः- 60 वर्ष, तत्कालीन मुख्यलेखापाल, परिवहन सेवा, ठाणे (सेवानिवृत्त) रा. डी/1301, श्री जी व्हिले, पाचपाखाडी ठाणे (5) श्री.गुरूकुमार पांडुरंग पेडणेकर, वयः- 67 वर्ष तत्कालीन वाहतुक अधिक्षक, परिवहन सेवा, ठाणे (बडतर्फ) रा..ए/1,6/1, योगेश बिल्डींग, श्री गणेश सोसायटी, सेक्टर 28, नेरूळ पश्चिम, नवी मुंबई (6) श्री.पिटर जॉन पिंटो, वयः- 59 वर्ष, तत्कालीन अंतर्गत लेखा परिक्षक, परिवहन सेवा, ठाणे (सेवानिवृत्त) रा. डी, 190, सेक्टर 3, ऐरोली, नवी मुंबई (7) श्री.लक्ष्मीकांत धनराज धुमाळ वय-54 वर्ष, व्यवसाय-नोकरी सुरक्षा अधिकारी, परिवहन सेवा,ठाणे रा.401, साई मल्हार को.ऑ.हौसींग सोसायटी, गणेश टॉवर जवळ, आग्रा रोड, कल्याण पश्चिम (8) श्री.दिलीप सदाशिव कानडे, वयः- 55 वर्ष, तत्कालीन वाहतुक निरीक्षक सध्या आगार व्यवस्थांपक अतिरिक्त कार्यभार कर्मचारी व प्रशासन अधिकारी, परिवहन सेवा, ठाणे रा. अ/10, गुरूकुल सोसायटी,पाचपाखांडी,ठाणे यांनी त्यांना (लोकसेवक) म्हणुन त्यांना मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन,संगनमताने कट रचुन यातील (9) खाजगी इसम श्री.प्रविण माथुरभाई सोलंकी, वयः- 52 वर्ष, व्यवसायः- प्रोप्रायटर मे.सोल्युशन्स अँडव्र्हटायझिंग, ठाणे रा. 101/102, ए विंग, क्लासिक बिल्डींग,निलंकठ पाम,तुलसीधाम, ठाणे याने (10) खाजगी इसम श्री.भावेश प्रभुदास भिंडे, मॅनिजींग डायरेक्टर गुज्जु अँडस् प्रा.लि. रा. 1401, ए विंग, गोल्डन व्हिलोज, सरदार तारासिंग गार्डन समोर, मुंलुड पश्चिम, मुंबई 80 व इतर यांचे मदतीने परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिकेच्या 470 बस प्रवासी निवाऱ्यांच्या मुळ जागी बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा (Built, Operate & Transfer) या तत्वावर बस प्रवासी निवारे बांधुन त्यावर जाहिरात प्रदर्शित करण्याचे हक्क देणेबाबत ठेका मिळण्याकरिता ठाणे परिवहन सेवेकडुन घेण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये (अ) लखोटा क्रमांक 1 मध्ये जॉईन्ट व्हेंचरची तरतुद नसताना सुध्दा मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग यांनी मे.विश्वर पब्लिसिटी, मे.झेनिथ आउटडोअर व मे.गुज्जु अँड प्रायव्हेट लिमीटेड या कंपन्याची बनावट कन्सोर्टीयम डिड तयार करुन ती खरी असल्याचे भासविले तसेच सदर कंपनीची लगतच्या तीन वर्षाचे नफातोटा व ताळेबंदीबाबतची अपुर्ण कागदपत्रे जोडली असताना सुध्दा मे.सोल्युशन अँडव्र्हटायझिंग यांनाच ठेका मिळावा म्हणुन त्यांना बेकायेदशीरपणे सहाय्य केले व मे.सोल्युशन अँडव्र्हटायझिंग यांना ठेका मिळवुन दिला.(ब) निविदा प्रक्रीये मधील लखोटा क्रंमाक 2 उघडते वेळी मे.एक्सल अँडव्हर्टायझिंग अँण्ड मार्केटिंग,ठाणे यांचे प्रतिनिधी श्री.कृष्णा कोबनाक हे हजर असल्याचे उपस्थिती पत्रावर दर्शविण्यात आलेले आहे.परंतु छाननी समितीने श्री.कृष्णा कोबनाक हे हजर नसताना त्यांची बनावट सही खरी असल्याचे भासवुन मे.सोल्युशन अँडव्हर्टायझिंग, ठाणे यांना बेकायदेशिर रित्या ठेका मिळवुन देण्यास मदत केलेली आहे(क) मे.सोल्युशन अँडव्र्हटायझिंग यांना सदरचा ठेका मिळाल्यानंतर त्यांने करारनाम्यानुसार अटी व शर्तीची पुर्तता केलेली नसताना सुध्दा बेकायदेशीरपणे त्यास इसारा रक्कम 10,00,000/-रुपये परत केली. (ड) मे.सोल्युशन अँडव्र्हटायझिंग यांचे एकुण देकारप्रमाणे म्हणजे 8,62,63,450/- रुपयाच्या 25 टक्के घ्यावयाची बँक गॅरंटी रक्कम 2,15,65,863/- रुपये इतकी होत असताना सुध्दा त्यांचे कडुन फक्त 9 बसेसच्या एकत्रीत किंमत रक्कम रू 2,07,63,450/- यावरील 25 टक्के इतकी रक्कम रू. 51,90,863/- ची बँक गॅरंटी घेतली आहे. त्यामुळे ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेचे परत केलेली इसारा रक्कम 10,00,000/- रुपये व एकुण देकारचे कमी घेतलेले बँक गॅरंटीचे 1,63,75,500/- रुपये तसेच ठाणे महानगरपालिकेच्या जाहिरात विभागाचा जाहीरात कर रुपये 4,99,80,946 असे एकुण 6,73,55,946/- रुपयाचे ठाणे महानगर पालीकेचे हेतुपुरस्सर व जाणीवपुर्वक आर्थीक नुकसान व तितकाच ठेकेदार यांचा आर्थीक फायदा करुन दिला म्हणुन वरील नमुद लोकसेवक अनुक्रमांक 01 ते 08 व खाजगी इसम अनुक्रमांक 09 व 10 व इतर यांचे विरुध्द भा.दं.वि.सं कलम 465, 467, 468, 471, 120 (ब) व भ्र.प्र.अधिनियम सन 1988 चे कलम 13(1)(क)(ड), 13(2) अन्वये सदर लोकसेवक आरोपीत क्रमांक 1 ते 8 व खाजगी इसम अनुक्रमांक 9 ते 10 व इतर याचे विरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष, ही फिर्याद लिहुन दिली,

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** VIJAY AABAJI SHINDE(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

S. Kolle

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** VIJAY AABAJI SHINDE
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

S. Kolle
पोलीस ठाणे अंमलदार
श्रीनगर पोलीस स्टेशन
ठाणे शहर